Rubicon® RESEARCH

INNOVATION | QUALITY | CARE

Date: July 30, 2026

To,
The Manager
Listing Department
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street – Fort
Mumbai 400 001
Scrip Code: 544578

To,
The Manager
Listing Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, 5th floor, Plot no. C/1, G Block
Bandra Kurla Complex, Bandra (East),
Mumbai - 400 051
NSE Symbol: RUBICON

ISIN - INE506V01022

Sub: Newspaper Advertisement titled "Information Regarding 27th Annual General Meeting to be held Through Video Conferencing/ Other Audio-Visual Means, Final Dividend and Record Date Information"

Dear Madam/Sir,

We enclose copies of the newspaper advertisement published on July 30, 2026, intimating the shareholders about the AGM, procedure for e-voting, manner of registering or updating email address, bank account and other KYC details, final dividend and record date, in the following newspapers:

Name of the Newspaper	Edition and Language	Date of Issue
Financial Express	All Edition - English	July 30, 2026
Loksatta	Mumbai Edition - Marathi	July 30, 2026

We request you to take the above information on record.

Yours faithfully,
For Rubicon Research Limited
(Formerly known as Rubicon Research Private Limited)

DEEPASHREE OMKAR TANKSALE
Digitally signed by DEEPASHREE OMKAR TANKSALE
Date: 2026.07.30 15:32:59 +05'30'

Deepashree Tanksale
Company Secretary
M. No. A28132

Encl. as above

अमेरिका-सौदीचे इराकवर हल्ले

इराणशी संलग्न २० बंडखोर ठार, इराककडून निषेध

रॉयटर्स, दुबई / कैरो

अमेरिकेने इराणवरील हल्ले थांबविल्यानंतर पश्चिम आशियातील संघर्ष थांबल्याची शक्यता दिसत असताना अमेरिका आणि सौदी अरेबियाने बुधवारी इराकमधील इराणशी संलग्न बंडखोरांवर हल्ले केले. या हल्ल्यात २० जणांचा मृत्यू झाला. इराणनेही जॉर्डनमधील अमेरिकेच्या तळांवर आणि होर्मुझ सामुद्रधुनीमधून जाणाऱ्या नौकांवर हल्ले केले. यामुळे तेलाचे दर पुन्हा वाढले.

'आम्ही त्यांच्यावर जोरदार हल्ले करू,' अशी धमकी देतानाच 'आम्ही त्यांना चर्चाही करू देऊ,' अशी वक्तव्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. दरम्यान, 'होर्मुझ'मधून जाणाऱ्या नौकांनी ऐच्छिक शुल्क द्यावे, हा ओमानचा प्रस्ताव इराणने फेटाळला.

इराकमधील 'पॉप्युलर मोबिलायजेशन फोर्सेस' या निमलष्करी दलाला इराणचा पाठिंबा आहे. अमेरिकेच्या हल्ल्यात किमान २० जण ठार आणि ३२ जण जखमी झाल्याचे या दलातील अधिकाऱ्यांनी सांगितले. इराकमधील अनेक तळांना अमेरिका आणि सौदी अरेबियाने लक्ष्य केले.

दुसरीकडे, इराणबरोबरच्या युद्धात अमेरिकेबरोबर हल्ले करण्याचा निर्णय सौदी अरेबियाने घेतल्याने या युद्धाची व्याप्ती वाढली आहे.

नौकांवरील हल्ल्यांचा भारताकडून निषेध

न्यूयॉर्क : पश्चिम आशियातील वाढत्या तणावाबाबत भारताने संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत चिंता व्यक्त केली असून, होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये व्यावसायिक नौकांवर झालेल्या हल्ल्यांचा निषेध केला आहे. आंतरराष्ट्रीय समुद्रातून खुली सागरी वाहतूक पूर्ववत व्हावी, असे आवाहन भारताने केले. भारताचे कायमचे प्रतिनिधी पी. हरिश यांनी 'यूएन'मध्ये ही भूमिका मांडली.

पाकव्याप्त काश्मीरमध्ये संघर्ष

'जेएएसी'च्या २० जणांचा मृत्यू

पाकव्याप्त काश्मीरमधील निदर्शकांच्या समर्थनार्थ इस्लामाबादमध्येही मोर्चे काढण्यात आले.

पीटीआय, इस्लामाबाद

पाकव्याप्त काश्मिरातील विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात सुरक्षा दलांबरोबर सोमवारी झालेल्या संघर्षात बंदी घालण्यात आलेल्या 'जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी'च्या (जेएएसी) २० कार्यकर्त्यांचा मृत्यू, तर दोन डझनहून अधिक जण जखमी झाल्याची माहिती संघटनेने बुधवारी दिली. सुरक्षा दलांनी मृतांच्या आकड्याबाबत संशय व्यक्त केला, तसेच 'जेएएसी'च्या निदर्शकांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर गोळीबार केल्याचा आरोप केला आहे.

पाकव्याप्त काश्मीर विधानसभेत ५३ जागा आहेत, त्यापैकी ४५ जागा थेट निवडणुकीद्वारे निवडल्या जातात, तर आठ जागा महिला, तंत्रज्ञ आणि धर्मगुरूंसाठी राखीव आहेत. येथील १२ वादग्रस्त जागांवरून 'जेएएसी' गेल्या महिन्याभरापासून निदर्शने करत आहे. सोमवारी १३ जागांसाठी मतदानाचा पहिला टप्पा पार पडत असताना, 'जेएएसी'ने रावलकोटपासून मुझफ्फराबादच्या दिशेने मोर्चा काढला. 'जेएएसी'ने दावा केला की, मोर्चात सहभागी झालेल्यांवर सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात अनेक कार्यकर्ते मारले गेले.

'भारतप्रमाणेच निदर्शक आमचे शत्रू'

पाकव्याप्त काश्मीरमधील निदर्शक हे भारतप्रमाणेच आमचे शत्रू आहेत. त्यांच्याशी कोणतीही चर्चा केली जाणार नाही, असे पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ म्हणाले. "आंदोलकांशी कोणताही संवाद साधला जाणार नाही. मी त्यांना भारताइतक्या श्रेणीत ठेवतो, त्यांना भारताप्रमाणेच मानतो," असे ते म्हणाले.

केंद्राचे मौन, फारुक यांचे प्रश्नचिन्ह

श्रीनगर : पाकव्याप्त काश्मीरच्या परिस्थितीबाबत केंद्र सरकारच्या मौनावर नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुक अब्दुल्ला यांनी बुधवारी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा मुद्दा उपस्थित करावा, असे ते म्हणाले.

मध्य प्रदेशात शेतकऱ्यांचा मोर्चा

भोपाळ : राज्य सरकारने किमान आधारभूत किमतीला मुगाची खरेदी करावी या मागणीसाठी मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांनी बुधवारी मोर्चा काढला. हा मोर्चा राजधानी भोपाळ येथे मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानापासून एक किमी अंतरावर अडवण्यात आला. शेतकऱ्यांना अडवण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच रस्त्यावर अनेक बॅरिकेड उभारण्यात आले होते. त्यापूर्वी शेतकऱ्यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या घराबाहेर धरणे आंदोलन केले.

नक्षलवादी मिसिर बेसराला अटक

गडचिरोली : नक्षलवादविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांनी मंगळवारी मोठे यश मिळवत नक्षलवादी संघटनेच्या नेतृत्वाला जबर धक्का दिला. झारखंडमधील सारंडा परिसरात सक्रिय असलेल्या २४ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली, तर भाकप (माओवादी) संघटनेचा पॉलिट ब्युरोचा सदस्य आणि २.१० कोटी रुपयांचे बक्षीस असलेला नक्षलवादी नेता मिसिर बेसरा याला दोन साथीदारांसह अटक करण्यात आली. धनबाद-गिरिडीह सीमेवरील मनियाडीह परिसरात ही कारवाई झाली.

ओडिशात तिघांचा मृत्यू

पीटीआय, भुवनेश्वर

ओडिशामध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली पूरपरिस्थिती कायम असून यात तिघांचा मृत्यू झाला असून पाच लाख लोक बाधित झाले आहेत. उत्तरेकडील बालासोर, भद्रक, जाजपूर, मयूरभंज, संबलपूर आणि धेनकानल या सहा जिल्ह्यांना पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे.

केओंझार जिल्ह्यात बुधवारी पावसाशी संबंधित दुर्घटनांमध्ये तीन जणांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. यामध्ये भिंत कोसळून एका वृद्धाचा, पुरात बुडून एका मुलाचा आणि साचलेले पाणी पंपाद्वारे बाजूला करताना वीजेचा धक्का लागल्याने एका अग्निशमन जवानाचा मृत्यू झाला.

केओंझार, सुंदरगड, झारसुगुडा, बारगड, नौपाडा, कालाहंडी, रायगड आणि गजपती या जिल्ह्यांतील काही भागातही पूरपरिस्थिती आहे.

आसाममध्ये मृतांची संख्या ७८

गुवाहाटी : आसाममधील पुरातील मृतांची संख्या बुधवारी ७८ वर पोहोचली. मागील २४ तासांत राज्यात पावसाशी संबंधित दुर्घटनांमध्ये आणखी १० जणांच्या मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. पुरामुळे राज्यात अजूनही तीन लाख ३२ हजार लोक बाधित आहेत.